RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ४७(२)] बुधवार, जून १७, २०२६/ज्येष्ठ २७, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ७२

प्राधिकृत प्रकाशन

उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), कोकण रेल्वे-१, रत्नागिरी यांजकडून

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक उपजि./भूसं./कोरे-१/एसआर/५९/२०२५.—ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/ प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा **'जिल्हाधिकारी'** हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी **'समुचित शासन'** असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या **अनुसूची दोन** मध्ये दिलेले आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या **अनुसूची तीन** मध्ये दिलेली आहेत ; (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश **महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र** भाग ४ - अ क्र. ३८, दि. १३ मार्च २०१५ च्या अनुक्रमांक (क) अन्वये संरक्षण सिद्धता; किंवा संरक्षणविषयक उत्पादन या सह भारताची राष्ट्रीय सुरक्षा व संरक्षण या दृष्टीने महत्त्वाचे असे प्रकल्प यांना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई करण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे. ज्याबाबत विस्तृत विवरण **अनुसूची चार** मध्ये दिलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या **अनुसूची पाच** मध्ये दिलेला आहे ;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या (कलम ११) च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकांस उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही :

तसेच, उक्त अधिनियमांच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) याच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) कोकण रेल्वे-१, रत्नागिरी यांस पदनिर्देशित करतील.

अनुसूची- एक

जमिनीचे वर्णन

मौजे - चिंचुर्टी, ता. लांजा, जि. रत्नागिरी (LAQ/SR 59)

साठवण तलाव पालु लघुपाटबंधारे योजना मौजे चिंचुर्टी, ता. लांजा, जि. रत्नागिरी या योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश व पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र.

अनुक्रमांक	भूमापन किंवा गट क्रमांक/सर्व्हे नं./हिस्सा नं.	अंदाजित क्षेत्र (हेक्टर आर मध्ये)
१	२१ पै.	०.२३.०६
२	२२ पै.	०.३८.२४
३	२३ पै.	०.२४.७५
४	२४	०.६३.००
५	२५	०.०२.००
६	२६	०.०२.००
७	२७	०.२२.००
८	२८ पै.	०.०५.२४
९	३० पै.	०.३५.३६
१०	३३ पै.	०.०२.७१
११	३४ पै.	०.०५.३९
१२	३५ पै.	०.०२.९०
१३	१६७ पै.	०.११.५७
१४	२७६ पै.	०.४३.७३

अनुक्रमांक	भूमापन किंवा गट क्रमांक/सर्व्हे नं./हिस्सा नं.	अंदाजित क्षेत्र (हेक्टर आर मध्ये)
१५	३२६ पै.	०.१७.८०
१६	३३४ पै.	०.५२.०७
१७	३३५	०.५६.००
१८	३३६	०.३५.००
१९	३३७	०.५४.००
२०	३३८ अ	०.६१.९३
२१	३४६	३.११.३०
२२	३४७	०.४८.००
२३	३४८ पै.	०.९०.३४
२४	३५८ पै.	०.२०.५१
२५	३५९ पै.	०.२५.२३
२६	३६० पै.	०.४८.९६
२७	३६२ पै.	०.९०.६३
२८	३६३ पै.	१.०६.०२
२९	३६४ पै.	०.२४.५१
३०	३६५ पै.	०.३२.४१
३१	३६६ पै.	१.०२.००
३२	३६७ पै.	०.२०.००
३३	३६८ पै.	०.४७.००
३४	३६९ पै.	०.५७.००
३५	३७० पै.	१.५२.००
३६	३८० पै.	१.५०.७८
३७	३७९ पै	०.२२.५१
३८	वहाळ	३.५०.८४
	एकूण क्षेत्र	**२२.५८.७९**

अनुसूची- दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव — लघुपाटबंधारे योजना मौजे चिंचुर्टी, ता. लांजा, जि. रत्नागिरी

प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन — साठवण तलाव पालु लघुपाटबंधारे योजना मौजे चिंचुर्टी, ता. लांजा, जि. रत्नागिरी या योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश व पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र.

समाजाला मिळणारे लाभ — साठवण तलावामुळे अप्रत्यक्ष सिंचनाचा फायदा होत असून सार्वजनिक हितासाठी शेतीचा विकास होईल.

अनुसूची- तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

साठवण तलाव पालु लघुपाटबंधारे योजना मौजे चिंचुर्टी, ता. लांजा, जि. रत्नागिरी या योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश व पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र या प्रयोजनासाठी जमिनीचे संपादन करण्यात येत आहे. तसेच बाधित क्षेत्रात निवासी जागेचा अंतर्भाव होत नाही. म्हणून बाधित कुटुंबाच्या विस्थापनाचा व पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

अनुसूची- चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

दिनांक २५ जुलै २०२५ अन्वये दिलेल्या पत्रानुसार पालु येथील लघुपाटबंधारे प्रकल्पाचे पालु साठवण तलाव, बुडीत क्षेत्र, सांडवा, प्रवेश पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्राकरिता भूसंपादन केल्याने प्रकल्प पूर्ण झाल्यावर गावातील पिण्याच्या पाण्याचा १०० टक्के प्रश्न कायमस्वरुपी सुटणार आहे. १४७ हे. आर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे कृषी उत्पादनामध्ये वाढ होऊन मुबलक हिरवा चारा निर्माण होणार आहे. पशुपालन, दुग्ध व्यवसाय, शेती, फळबाग लागवड होऊन स्थानिकांना व सभोवतालच्या गावातील लोकांना रोजगार मिळवून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा वाढणार आहे. रोजगारासाठी स्थलांतरित झालेली कुटुंबे परत गावात येतील. पाणीसाठ्यामुळे मत्स्यपालन, बोटींग, मासेमारी इत्यादी मुळे पर्यटनात वाढ होईल. सामाजिक दृष्ट्या भौतिक, नैसर्गिक संसाधनांवर तसेच भूमी व सार्वजनिक संपत्ती यावर कोणताही सामाजिक दुष्परिणाम दिसून येत नाही. सामाजिक निर्धारण पथकाने केलेल्या अभ्यासाअंती सदर प्रकल्पास बाधित सर्व लोकांची संमती असल्याचे आढळून आले आहे. हा प्रकल्प भविष्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असा आहे. एकूण लाभाचे प्रमाण हानी व नुकसान यापेक्षा किती तरी पटीने अधिक आहे.

अनुसूची- पाच

सदर भूसंपादनामुळे बाधीत होत असणाऱ्या क्षेत्रात निवासी जागेचा समावेश होत नसल्याने या ठिकाणी एकही कुटुंब बाधीत होत नाहीत. त्यामुळे पुनर्वसन व पुनःस्थापनेसाठी प्रशासक नेमण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

टीप.— उक्त जमिनीच्या नकाशाचे उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), कोकण रेल्वे-१, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी या कार्यालयात निरीक्षण करता येईल.

रत्नागिरी,
दिनांक ८ जून २०२६.

रोहिणी रजपूत,
उप जिल्हाधिकारी (भूसंपादन),
कोकण रेल्वे-१, रत्नागिरी,
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.